# आर्थिक विकास आणि नियोजन
## Gen. Paper III

Page No. | Date

विभाग I

unit-1 आर्थिक विकास आणि वृद्धी
अ. आर्थिक विकास व वृद्धीचा अर्थ
ब. आर्थिक विकासाचे निर्देशक
क. आर्थिक वृद्धीचे निर्देशक
ड. आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यांतील फरक

unit-2 विकसनशील देश
अ. संकल्पना - विकसित व विकसनशील देश
ब. विकसनशील देशांची वैशिष्ट्ये -
1) आर्थिक वैशिष्ट्ये
2) लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये
3) सामा. व सांस्कृ. वैशिष्ट्ये
4) तंत्रज्ञानविषयक वैशिष्ट्ये
5) इतर वैशिष्ट्ये

unit-3 विकास प्रक्रियेतील अडथळे.
अ. दारिद्र्याचे दुष्टचक्र
ब. लोकसंख्येचा प्रस्फोट
क. शेतीची कमी उत्पादकता
ड. भांडवलाची टंचाई
इ. अयोग्य तंत्रज्ञान
ई. सामा.- सांस्कृतिक अडथळे
उ. राजकीय व प्रशासकीय अडथळे
ऊ. बाह्य अडथळे.

unit-4 आर्थिक विकासाचे सिद्धान्त.
अ. आर्थिक विकासाचा सनातन सिद्धान्त - ॲडम स्मिथ, रिकार्डो, माल्थस.
ब. कार्ल मार्क्सचा आर्थिक विकासाचा सिद्धान्त
क. शुम्पीटर यांचा आर्थिक विकासाचा सिद्धान्त

विभाग-2

unit-5 आर्थिक विकास विषयीचे दृष्टीकोन

अ. प्रबळ चालना सिद्धान्त / दृष्टीकोन

ब. संतुलित विकासाचा सिद्धान्त

क. असंतुलित विकासाचा सिद्धान्त / दृष्टीकोन

ड.

unit-6 परकिय भांडवल आणि विकास

अ. परकिय भांडवलाचा अर्थ आणि विकासाची भूमिका

ब. परकिय भांडवलाच्या समस्या

क. खाजगी परकिय गुंतवणूक - प्रकार व भूमिका

ड. सार्वजनिक परकिय गुंतवणूकीचे प्रकार

इ. विदेशी मदत - सशर्त मदत व बिनशर्त मदत

unit-7 समग्रलक्षी आर्थिक धोरण

अ. चलनविषयक धोरण - उद्दिष्ट्ये, साधने, मर्यादा

ब. राजकोशिय धोरण - उद्दिष्ट्ये, साधने, मर्यादा

क. व्यापारचक्र विरोधी उपाययोजना

क

unit-8 आर्थिक नियोजन

अ. आर्थिक नियोजनाचा अर्थ व व्याख्या

ब. आर्थिक नियोजनाची आवश्यकता

क. आर्थिक नियोजनाची उद्दिष्ट्ये - आर्थिक, सामाजिक, राजकीय.

ड. सर्वसमावेशक वृद्धी व 11 वी पंचवार्षिक योजना

इ. नितीआयोग.

# 1. आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी

Friday 20-7-18

**प्रस्तावीक :-**

जगातील बहुतेक राष्ट्रांनी आणि विशेषत: तिसऱ्या जगातील राष्ट्रांनी दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी आर्थिक विकासाच्या उद्दिष्टाला प्राधान्यक्रम दिलेले आहे. आर्थिक विकास हा अभ्यासाचा महत्वाचा विषय असून आर्थिक विकास ही अनेक राष्ट्रांपूढे एक महत्त्वाची समस्या देखील आहे. जगातील प्रत्येक देशाचा विकास हा प्राथमिक अवस्थेत आर्थिक विकास म्हणूनच ओळखला जातो. त्या दृष्टीने आर्थिक विकास म्हणजे नेमके काय? या संकल्पनेचा सविस्तर आढावा घेऊ.

* आर्थिक विकासाचा अर्थ - आर्थिक विकासाचा संबंध औद्योगीकरणाशी जोडला जातो. लोकसंख्येचे शेती क्षेत्रावरील अवलंबित्व कमी करून उद्योग व सेवा क्षेत्रावरील अवलंबित्व वाढवणे. म्हणजे आर्थिक विकास असा अर्थ घेतला जातो. आर्थिक विकास होतो म्हणजे लोकसंख्येच्या क्षेत्रवार विभागणीत बदल घडून येतो. उत्पादनाच्या रचनेत आणि आदानांच्या क्षेत्रवार विभागणीत बदल घडून येतो. उत्पादनात वाढ, नवीन तंत्रज्ञान आधुनिक संघटन, राहणीमानात सुधारणा इ. बाबी घडून येणे म्हणजे आर्थिक विकास होय.

व्याख्या

1) "प्रा मायर व बाल्डवीन :-

"आर्थिक विकास म्हणजे अशी एक प्रक्रिया की ज्यामूळे दीर्घकाल अर्थव्यवस्थेच्या वास्तव व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत जाते."

2) प्रा ओक्युन आणि रिचर्डसन :-

"वस्तू व सेवांच्या उत्पादनातील वाढीमूळे भौतिक कल्याणामध्ये निश्चित स्वरूपाची वाढ अथवा सुधारणा म्हणजे आर्थिक विकास होय."

प्रा लुईस -
"दरडोई उत्पादनात होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास होय."
याप्रकारे आर्थिक विकासाची व्याख्या केली जाते. काही अर्थतज्ञ आर्थिक विकासाचा संबंध राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीशी जोडतात तर काही समाजाच्या भौतिक कल्याणाशी जोडतात तर काही दरडोई उत्पन्नात होणाऱ्या वाढीशी जोडतात असे दिसते.

* आर्थिक वृद्धीचा अर्थ :-
नेहमीच्या व्यवहारात आपण आर्थिक विकास आणि वृद्धी या संकल्पना समान अर्थाने वापरत असलो तरी प्रा. जोसेफ शुम्पीटर आणि प्रा. जे.के. मेहता यांनी आर्थिक विकास आणि वृद्धी या संकल्पना वेगवेगळ्या असल्याचे म्हटले आहे. त्या दृष्टीने आर्थिक वृद्धीची व्याख्या पाहू.

* व्याख्या
(1) * प्रा. जोसेफ शुम्पीटर :→
"एखाद्या अर्थव्यवस्थेत दीर्घ काळात सावकाश व सतत होत जाणारा बदल म्हणजे आर्थिक वृद्धी."

(2) * प्रा. जे.के. मेहता :-
"दीर्घकाळात अर्थव्यवस्थेत घडून येणारे संख्यात्मक स्वरूपाचे बदल म्हणजे आर्थिक वृद्धी होय."

(3) * प्रा. एडीसन :-
"विकसित देशामध्ये उत्पन्नाची पातळी उंचावण्यासाठी केले जाणारे प्रयत्न म्हणजे आर्थिक वृद्धी होय."
याप्रकारची आर्थिक वृद्धीची व्याख्या केली जाते. थोडक्यात आर्थिक वृद्धी म्हणजे विकसित देशामध्ये विकासाची चालणारी प्रक्रिया होय. अशा देशात उत्पादनात संख्यात्मक स्वरूपाचे बदल दिसतात.

Saturday
21-7-18

* आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यांतील फरक -
आर्थिक विकास व वृद्धी-तील फरक विविध विचारवंतांच्या मतांच्या आधारे पुढीलप्रमाणे दाखवलेला आहे.

1) वाढीच्या प्रक्रियेचे स्वरूप :- आर्थिक विकासाची प्रक्रिया मागासलेल्या अथवा विकसनशील देशात तुरक अथवा खंडित स्वरूपाची असते. कारण या देशापुढे अनेक प्रश्न, अनेक अडचणी असतात.
याउलट आर्थिक वृद्धीची प्रक्रिया विकसित देशात साव-काश व सातत्याने चालणारी असते. काही विकसित देशात वाढीसाठी आवश्यक बाबींची उच्च पातळी अगोदरच गाठ-लेली असते.

2) साधनांची स्थिती - अल्प विकसित देशात विकासासाठी आव-श्यक साधन सामग्री मुबलक असते. या साधनांचा उपयोग देखील माहित असतो. परंतू अर्थ व्यवस्थेच्या विकासाच्या अभा-वामुळे साधनांचा विकास झालेला नसतो. अशा स्थितीमध्ये प्रथम साधनांचा विकास करणे हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा आवश्यक भाग असतो.
याउलट विकसित देशात साधनांचा विकास झालेला असतो. त्यामूळे उत्पादन वाढीला वेग मिळतो.

3) व्यापक संकल्पना :- आर्थिक विकास ही संकल्पना आर्थिक वृद्धीपेक्षा जास्त व्यापक आहे. कारण या संकल्पनेत आर्थिक बदलाबरोबरच राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, वैचारिक व मानसिक बदलाचाही विचार केला जातो.
याउलट आर्थिक वृद्धीमध्ये फक्त आर्थिक घटकां-तील बदलांचाच समावेश असतो.

4) संख्यात्मक व गुणात्मक फरक :- आर्थिक विकास ही संकल्पना

गुणात्मक बदल दर्शवते तर आर्थिक वृद्धी ही संकल्पना संख्यात्मक बदल दर्शविते.

5) <u>प्रेरणा व जबाबदारी</u> :- आर्थिक वृद्धीसाठी विकसित भांडवलशाही देशामध्ये बाजार यंत्रणा ही हीच प्रेरणादायी शक्ती ठरते. भांडवलदार केवळ नफ्याच्या प्रेरणेने वस्तूचे उत्पादन आणि उत्पादन तंत्राबाबत निर्णय घेत असतात.

याउलट अल्प विकसित देशात बाजार यंत्रणेच्या मर्यादेमूळे आर्थिक विकासाची जबाबदारी शासनाला घ्यावी लागते. अशा देशात दारिद्र्याचे दृष्टचक्र, शेतीची अल्प उत्पादकता, भांडवलाचा अभाव, प्रचंड बेकारी, आर्थिक विषमता, मागासलेपणा, इ. समस्या मोठ्या प्रमाणात असतात. त्या सोडविण्यासाठी शासनाला पुढाकार घ्यावा लागतो.

6) <u>साधन सामग्रीचा वापर</u> :- अल्प विकसित देशात भांडवल अभावी साधन सामग्री न वापरलेल्या स्थितीत असते. त्यामूळे आर्थिक विकास खंडित स्वरूपाचा असतो.

याउलट विकसित देशात भांडवलाचा तुटवडा नसल्याने उत्पादन वाढीसाठी साधन सामग्रीचा कार्यक्षम वापर केला जातो. त्यासाठी आर्थिक वृद्धी ही संकल्पना वापरली जाते.

7) <u>प्रथम विकास नंतर वृद्धी</u> :- जगातील कोणताही देश प्रथमतः अविकसित व मागासलेला असतो. त्यामूळे प्रथम आर्थिक विकास नंतर आर्थिक वृद्धीची अवस्था येते. आर्थिक विकासात गुणात्मक बदलावर अधिक भर असतो. तर आर्थिक वृद्धीत संख्यात्मक बदलावर अधिक भर असतो.

Thursday 26-07-2018

8) <u>मार्गदर्शनाची आवश्यकता</u> :- →

आर्थिक विकासाच्या अवस्थेत अल्पविकसित देशात शासनाला अनेक बाबतीत मार्गदर्शन करावे

लागते. तेथे विकासाच्या प्रेरणा निर्माण कराव्या लागतात.
याउलट विकसित देशात शासनाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता नसते. अशा देशात नफा या प्रेरणेमुळे उत्पादन वाढीच्या प्रक्रियेला स्वतःची एक गती प्राप्त झालेली असते.

9) संबंध :- आर्थिक विकासाचा संबंध देशाच्या अल्पविकसित अथवा विकसनशील अवस्थेशी असतो.
याउलट आर्थिक वृद्धीचा संबंध देशाच्या विकसित अवस्थेशी असतो.
याप्रकारचा फरक आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी यात केला जातो.

★ आर्थिक विकासाचे निर्देशक / घटक :
एखाद्या देशाच्या आर्थिक विकास होत आहे अथवा नाही हे मोजण्यासाठी ज्या कसोट्या वापरल्या जातात त्या पुढीलप्रमाणे आहेत.

1) वास्तव व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :
वास्तव व राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीला आर्थिक विकासाचा निर्देशक मानले आहे. त्यासाठी देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात सतत वाढ होणे आवश्यक आहे. आर्थिक विकासाचे मापन करण्याच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्न हा सर्वात सोपा मानदंड आहे.

2) दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ -
मागासलेल्या देशाच्या दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ होत आहे. हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. समजा अशा देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही त्या देशाच्या लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा अधिक असेल तर दरडोई वास्तव उत्पन्न वाढत जाते. म्हणजेच त्या देशाच्या आर्थिक विकास होत आहे, असे म्हटले जाते.

3) राहणीमानात वाढ:-

वास्तव व राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई वास्तव राष्ट्रीय उत्पन्न या दोन निर्देशकात दोष आढळल्याने ते टाळण्यासाठी राहणीमानात वाढ हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. जर अल्प विकसित देशात लोक आपल्या उत्पन्नाचा जास्तीत जास्त भाग हा वस्तू व सेवांच्या उपभोगासाठी वापरत असतील तर त्यांच्या राहणीमानात वाढ होत राहते / जाते. अशावेळी त्या देशाचा आर्थिक विकास होत आहे असे मानले जाते. त्याचबरोबर अशा देशातील व्यक्तींचे सरासरी आयुर्मान, व साक्षरता वाढत असेल, बालमृत्युचे प्रमाण कमी होत असेल तर तेथील लोकांचे राहणीमान वाढत जाते. म्हणजेच अशा देशातील लोकांच्या आर्थिक विकास होतो आहे असा निष्कर्ष निघतो.

4) जीवनावश्यक गरजांची पूर्तता:-

अल्पविकसित अथवा मागासलेल्या देशात दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात आढळते. अशा देशात जर अशी समस्या कमी होत असेल लोकांचे आरोग्य व स्वच्छता, शिक्षण, निवारा, वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध होत असतील तर त्या देशाच्या आर्थिक विकास होत आहे असे म्हटले जाते.

5) आर्थिक कल्याणात वाढ:-

आर्थिक कल्याणाला आर्थिक विकासाचा निर्देशक मानले जाते. अर्थव्यवस्थेत होणाऱ्या वाढीमुळे लोकांच्या उत्पन्नात तसेच उपभोगात वाढ होत असेल उत्पन्न व संपत्तीचे न्याय वाटप तसेच सुखसोयींमध्ये वाढ होत असेल तर अशा देशाच्या आर्थिक कल्याणात वाढ होत आहे असे म्हटले जाते.

*

6) लोकसंख्येच्या क्षेत्रवार विभागणीत बदल:- आर्थिक विकासाच्या अवस्थेत अल्प विकसित देशातील लोकसंख्या ही शेती क्षेत्रा-

करून उद्योग व सेवा क्षेत्राकडे रोजगारासाठी स्थलांतरीत होत असेल तर अशा देशाचा आर्थिक विकास होत आहे असे मानले जाते.

7) उत्पादकतेत वाढ :- मागासलेल्या देशात प्रति तास अथवा प्रतिमाणसी उत्पादकता वाढत आहे का ? यावरून आर्थिक विकास मोजता येतो. जर अशा देशात मनुष्यबळाच्या मदतीने उत्पादकतेत वाढ होत असेल तर आर्थिक विकास होत आहे असे म्हणता येईल.

8) लोकसंख्येच्या ग्रामीण व शहरी विभागणीत बदल :-
औद्योगीकरणाच्या वाढीमुळे जेव्हा ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण रोजगार व उपजीविकेसाठी शहरी भागाकडे स्थलांतरीत होत असेल तर आर्थिक विकास होत आहे असे मानले जाते.

Friday
27-7-18

9) भांडवल संचयात वाढ :-
बचतीमधून भांडवल संचयन होत असते त्यातून गुंतवणूक व पर्यायाने उत्पादन वाढत असते. मागासलेल्या देशामध्ये अर्थव्यवस्थेत जर भांडवल संचयात वाढ होत असेल तर आर्थिक विकास होत आहे असे म्हणता येते.
वरील प्रकारचे घटक आर्थिक विकासाचे निर्देशक म्हणून ओळखले जातात.

★ आर्थिक वृद्धीचे निर्देशक घटक :-
आर्थिक वृद्धी या संकल्पनेचा संबंध विकसित देशाशी जोडला जातो. जगातील काही निवडक देश
उदा. अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान, कॅनडा, स्विझर्लंड या देशातील विकासाला आर्थिक वृद्धी या नावाने ओळखले जाते. अशा देशात आर्थिक वृद्धी होत आहे की नाही हे मोजण्यासाठी प्रा. सायमन कुसनेट्स यांनी पुढील निर्देशक सांगितले आहेत.

1) उच्च दराने लोकसंख्या व दरडोई उत्पन्नात वाढ-
आर्थिक वृद्धीच्या काळात दरडोई उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबरच लोकसंख्याही तितक्याच वेगाने वाढत असते. विकसित देशात उपलब्ध साधन संपत्तीच्या मानाने लोकसंख्या अगोदरच कमी असते. आर्थिक वृद्धीच्या काळात ती वाढते. परंतू उत्पादन इतके वाढत असते की लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा दरडोई उत्पन्नात अधिक वेगाने वाढ होत असते. बऱ्याच वेळेला विकसित देशात केवळ दरडोई उत्पन्नच वाढते. लोकसंख्या वाढत नाही. अशी परिस्थिती जेव्हा असते तेव्हा आर्थिक वृद्धी होत आहे. असे म्हटले जाते.

2) रचनात्मक परिवर्तन-
आर्थिक वृद्धीच्या काळात अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्राचे महत्व घटत जाऊन द्वितीय व तृतीय क्षेत्राचे महत्व वाढत जाते. त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढत जातो. प्राथमिक क्षेत्राचे लोकसंख्येचे प्रमाण खूपच घटत जाते. राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राच्या वाटा केवळ 2% ते 3% असा राहतो व उर्वरित वाटा द्वितीय व तृतीय क्षेत्राचा राहतो. अशी परिस्थिती जेव्हा दिसून येते तेव्हा आर्थिक वृद्धी मानली जाते.

3) नागरीकरण- रचनात्मक परिवर्तनाचा परिणाम म्हणून औद्योगिकरण वेगाने वाढत जाते. रोजगारासाठी लोकसंख्येचे ग्रामीण भागातून शहरी भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत जाते. शहरांची संख्या वाढत जाते. त्यामूळे नागरीकरण वाढते. नागरीकरणामूळे लोकांच्या मनोवृत्तीत बदल होतो. तेथील जन्मदर घटतो. लहान कुटूंब निर्माण होतात. शिक्षण व संशोधन क्षेत्राला विशेष महत्व प्राप्त होते. अशी परिस्थिती निर्माण दिसते. तेव्हा आर्थिक वृद्धी होत आहे असे म्हटले जाते.

4) उत्पादकतेत वाढ- विकसित देशाच्या अनुभव विचारात घेता सर्वच क्षेत्रातील उत्पादकतेत प्रचंड वाढ झालेली असते. अशा देशाजवळ

मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध असते. तांत्रिक प्रगती वेगाने होत असते. मानवी भांडवलाच्या गुणात्मक विकास होत असतो. अशी परिस्थिती जेव्हा विकसित देशात आढळते तेव्हा आर्थिक वृद्धी होत आहे असे म्हटले जाते.

5) जागतिक स्तरावरील प्रभावात वाढ :-

आर्थिक वृद्धीचा परिणाम म्हणून विकसित देशांचा जागतिक स्तरावर प्रभाव वाढलेला दिसतो. असे देश अल्प विकसित अथवा मागासलेल्या देशांना कच्चा माल व इतर सामग्री तसेच तांत्रिक ज्ञान देत असतात. तसेच विकसित देशाची परकिय गुंतवणूक वाढलेली असते. मागासलेल्या देशात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या ते निर्माण करतात. व आपला आर्थिक प्रभाव वाढत जातो. असे चित्र जेव्हा विकसित देशात दिसते. तेव्हा तेथे आर्थिक वृद्धी होत आहे असे म्हटले जाते.

6) उत्पादन घटकांचे स्थलांतर :-

आर्थिक वृद्धीच्या परिणाम म्हणून वस्तू, श्रम व भांडवल यांचे मोठ्या प्रमाणावर एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतर होत असते. अशा उत्पादक घटकांची विकसित देश, विकसनशील देशांकडे निर्यात करत असतात. त्यातून अविकसित देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळत असते. विकसित देशांच्या उत्पादन घटकांचे स्थलांतर झाल्याने आर्थिक वृद्धीच्या वेग वाढतो. म्हणून तो आर्थिक वृद्धीचा निर्देशक मानला जातो.

वरील प्रकारच्या घटकातून आर्थिक वृद्धीचे निर्देशक स्पष्ट होतात.